

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ८०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०२ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

पुणे, अहिल्यानगर, साताऱ्यात धुवांधार पाऊस ; तुमच्या जिल्ह्यात पडणार का?

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०१, पुणे : महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. पुणे, अहिल्यानगर आणि सातारा या जिल्ह्यांमध्ये पावसाने दमदाट बॅटिंग केली आहे. मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले आहेत. अनेक ठिकाणी पाणी साचलं आहे. तसेच काही ठिकाणी वाहतूक देखील मंदावली. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. दरम्यान, पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तर या पावसामुळे काही ठिकाणी शेतकरी चिंतेत पडले आहेत. अचानक आलेल्या पावसामुळे हाता तोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. तर दुसरीकडे ऊस आणि ज्वारी पिकांसाठी हा पाऊस दिलासादायक असणार असल्याची चर्चा आहे.

पुण्याच्या हिंजवडी परिसरात जोरदार पाऊस...

पुण्याच्या हिंजवडी परिसरात जोरदार पाऊस पडला. अचानक आलेल्या पावसाने हिंजवडी परिसरातील नागरिकांची चांगलीच त्रेधातिरपीट झाली. मुसळधार आलेल्या पावसामुळे हिंजवडीत आयटी पार्क परिसरात रस्त्यांवर पाणी साचले. यामुळे रस्त्याने येजा करणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला.

उद्घाटनाआधीच मान मेट्रो स्टेशनला गळती...

पुण्यात अचानक आलेल्या पावसाने मेट्रो कामांबाबतही प्रश्न उपस्थित केले. शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोचे सध्या काम सुरु असून लवकरच प्रवाशासाठी सुरु होणार आहे. पण उद्घाटनाआधीच शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोच्या मान स्टेशनला गळती लागलेली बघायला मिळाली. येत्या ३ नोव्हेंबरला या मेट्रो लाईनचे उद्घाटन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या मेट्रोचे उद्घाटन होणार आहे. पण त्याच्या दोन दिवसाआधीच मेट्रो स्थानकात मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याचे व्हिडीओ समोर आले आहेत. मान मेट्रो स्थानकाच्या नव्या इमारतीत गळती लागल्याने बांधकाम



ाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

अहिल्यानगर आणि साताऱ्यातही मुसळधार पावसाची हजेरी

सातारा जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला आहे. सातारा शहरासह ग्रामीण भागात पावसाने हजेरी लावली आहे. अचानक आलेल्या पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचलं. यासोबत रस्ते देखील जलमय झाले. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड शहरातदेखील आज पावसाने हजेरी लावली. जामखेडमध्ये ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला आहे. हवामान विभागाचा अंदाज काय?

बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ निर्माण झाले आहे. यामुळे महाराष्ट्राच्या वातावरणावर त्याचा परिणाम होताना दिसत आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये आज पाऊस पडल्यानंतर पुढच्या दोन ते तीन दिवसांमध्ये देखील पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, २ नोव्हेंबरला रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर जिल्हा आणि कोल्हापूर घाट परिसर, सातारा या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडून या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात वाऱ्याचा वेग हा ४० ते ५० किमी प्रतितास असण्याची शक्यता आहे.

३ नोव्हेंबरला कुठे-कुठे पाऊस पडणार?

हवामान विभागाकडून वर्तवण्यात आलेल्या अंदाजानुसार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, नांदेड, लातूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर ४ नोव्हेंबरसाठी कोल्हापूर जिल्हा, कोल्हापूर घाट परिसर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

नागपुरात ८ सराफा व्यापाऱ्यांना लॉरेन्स बिश्नोईच्या नावाने धमकी

अक्षराज : वृत्तसंकलन




दि.०१, नागपूर : दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना नागपुरातील सराफा बाजारात खळबळ उडवणारा प्रकार समोर आला आहे. नागपूर शहरातील तब्बल आठ सराफा व्यापाऱ्यांना कुख्यात लॉरेन्स बिश्नोई याच्या नावाने खंडणीची धमकी देणारी पत्रे पाठविण्यात आली आहेत. प्रत्येक व्यापाऱ्याकडे १० लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली असून, पैसे न दिल्यास गोळ्या घालून ठार मारण्यासह कापून टाकण्याची धमकी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ही पत्रे पोस्टाच्या माध्यमातून पाठविण्यात आली आहेत. दिवाळीच्या तोंडावरच व्यापाऱ्यांना लक्ष्य करण्यात आल्याने सराफा व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पत्रात नेमकं काय म्हटलं आहे?

मिळालेल्या माहितीनुसार, नागपुरातील आठ सराफा व्यापाऱ्यांना ही धमकीची पत्रे मिळालेली आहेत. पत्रांमध्ये लॉरेन्स बिश्नोईच्या नावाचा उल्लेख करण्यात आला असून प्रत्येक व्यापाऱ्याकडून १० लाख रुपयांची मागणी केली आहे. खंडणीची रक्कम देण्यासाठी काही व्यापाऱ्यांना तीन दिवस, तर काहींना पाच दिवसांची वेळ देण्यात आली आहे. निर्धारित वेळेत पैसे न दिल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा पत्रातून देण्यात आला आहे. तसेच धमकी देणाऱ्यांनी व्यापाऱ्यांना टायगर शॉफवर ज्याप्रमाणे हल्ला करण्यात आला, त्याच पद्धतीने तुमच्यावरही हल्ला करू, असा उल्लेख या पत्रात केल्याची माहिती आहे. तसेच जीवे मारण्याची, गोळ्या घालण्याची आणि कापून टाकण्याची धमकीही देण्यात आली आहे. खंडणी देण्यास तयार असाल तर दुकानाच्या बाहेर 'जय श्रीराम' असे लिहा, त्यानंतर आम्ही तुमच्यापर्यंत पोहोचू, असा संदेशही पत्रात देण्यात आला आहे. त्यामुळे या धमकीच्या पात्रांची चर्चा सराफा बाजारात सुरू झाली आहे.

सिंहगडावर १०० फुटी भगवा ध्वज उभारणार



दि.०१, पुणे : 'सिंहगड किल्ल्यावर पुणे महापालिकेच्या वतीने १०० फूट उंचीचा भव्य भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेने एक कोटी रुपयांची तरतूद केली असून, ध्वजस्तंभ उभारणीसह परिसराचे सुशोभीकरण, प्रकाशयोजना आणि ध्वजाची कायमस्वरूपी देखभाल केली जाणार आहे. सिंहगड किल्ला महापालिकेच्या भौगोलिक हद्दीबाहेर असल्याने या कामासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल,' असे स्थायी समितीचे अध्यक्ष भिमाले यांनी सांगितले. 'किल्ल्याचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेता येथे भगवा ध्वज उभारल्यास पर्यटनाला चालना मिळेल. नागरिकांमध्ये अभिमानाची भावना वृद्धिंगत होईल,' अशी भूमिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिलेल्या प्रस्तावात नमूद आहे. महापौर मंजूषा नागपुरे आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांसमवेत ११ सप्टेंबर रोजी सिंहगडावर प्रत्यक्ष जागेची पाहणी करून जागा निश्चित करण्यात आली होती. महामंडळाची आवश्यक मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे नियोजन आहे.

पर्वती टेकडीवर जाण्यासाठी 'रोप-वे' : पर्वती टेकडीवर जाण्यासाठी सारसबागेपासून प्रस्तावित 'रोप-वे'साठी सल्लागार नियुक्त करण्यात आला आहे. या सल्लागाराकडून प्रकल्पाचा सविस्तर आराखडा, तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तपासणी केली जाईल; तसेच निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी ही माहिती दिली. भिमाले यांनी अर्थसंकल्पात सारसबाग ते पर्वती रोप-वे प्रकल्प प्रस्तावित करत एक कोटी रुपयांची तरतूद केली होती. रोप-वे प्रकल्पासाठी महापालिकेकडे आवश्यक तज्ज्ञ व तंत्रकुशल मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्यामुळे प्रकल्पाच्या नियोजनापासून निविदा प्रक्रियेपर्यंतची जबाबदारी सल्लागारावर सोपविण्यात येणार आहे.

२७ टक्के ओबीसी आरक्षणाला धक्का लागू न देता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या

काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांची मागणी

अक्षराज : वसंत वडस्कर



दि.०१, चंद्रपूर : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसींच्या २७ टक्के राजकीय आरक्षणाला धक्का न लावता घेण्यात याव्यात अशी ठाम मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

सर्वोच्च न्यायालयातील आरक्षणासंदर्भातील आदेश आणि त्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीवर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, २९ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादेसंदर्भात आदेश दिल्याचे समोर आले होते. मात्र, आता हा आदेश न्यायालयाच्या संकेतस्थळावर दिसत नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. न्यायालयात सरकारने नेमकी कोणती बाजू मांडली आणि ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी कोणते ठोस प्रयत्न केले, हे सरकारने स्पष्ट करावे. राज्यात यापूर्वी ओबीसींसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५३५ जागा होत्या. आता निवडणुका झाल्यास त्यापैकी सुमारे २०० जागा कमी होण्याची शक्यता आहे. हा केवळ जागांचा आकडा नसून, ओबीसी समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न आहे. या जागा वाचविण्याची जबाबदारी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची नाही का? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन विरोधी पक्षनेते आणि आत्ताचे मुख्यमंत्री ओबीसी आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करुन आघाडी सरकारवर आरोप करत होते. मग आता सत्तेत असताना ओबीसींचे आरक्षण वाचवण्यासाठी सरकारने काय केले? सर्वोच्च न्यायालयात ओबीसींची बाजू भक्कमपणे मांडण्यात सरकार कमी का पडले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले की, गेली चार वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. या काळात ओबीसी समाजाचे राजकीय प्रतिनिधित्व संपुष्टात आले. या कालावधीत घरोघरी जाऊन जातनिहाय जनगणना केली असती, तर आवश्यक इम्पिरिकल डेटा उपलब्ध झाला असता. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. आता पुन्हा ओबीसींच्या आरक्षणाला कात्री लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. ओबीसींची खरी लोकसंख्या समोर येण्यासाठी जातनिहाय जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलम असणे आवश्यक आहे. ओबीसींची स्वतंत्र नोंदणी झाल्याशिवाय त्यांच्या लोकसंख्येचे आणि प्रतिनिधित्वाचे वास्तव समोर येणार नाही. मुख्यमंत्र्यांनी या विषयात पुढाकार घ्यावा. विरोधी पक्षातील नेत्यांना सोबत घेऊन पंतप्रधानाची भेट घ्यावी आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न केंद्र सरकारसमोर मांडावा. आम्हीही या मागणीसाठी सरकारसोबत येण्यास तयार आहोत. आरक्षण वाचवण्यासाठी सरकारने राजकीय मतभेद बाजूला ठेवून प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

आमची भूमिका स्पष्ट आहे. निवडणुकांना आमचा विरोध नाही, मात्र, ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणाला धक्का लावून निवडणुका घेणे मान्य नाही. ओबीसींच्या राजकीय प्रतिनिधित्वाचे नुकसान होता कामा नये. २७ टक्के आरक्षण गृहीत धरुनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात. ओबीसी समाजाच्या आरक्षणाचे आणि राजकीय हक्कांचे नुकसान झाल्यास त्याच

जबाबदारी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना घ्यावी लागेल, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

वन्य प्राण्यांचे दर्शन हवे असेल तर त्यांचे अस्तित्व जपा ! माथेरानच्या जंगलाचे रक्षण करा

अक्षराज : चंद्रकांत सुतार

दि.०१, माथेरान : जंगलाला वन्यप्राण्यांशिवाय शोभा नाही आणि वन्यप्राण्यांना जंगलाशिवाय अस्तित्व नाही. जंगल आणि वन्यजीव हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मात्र, आज मानवी हस्तक्षेप आणि शिकारीमुळे माथेरानच्या जंगलातील अनेक वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ वनविभागाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात सहभागी होणे गरजेचे आहे.

आज सकाळपासून माथेरानच्या जंगलातील रानडुकरांचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहेत. वन्यप्राणी प्रत्यक्ष जंगलात दिसणे ही पर्यटकांसाठी आणि निसर्गप्रेमींसाठी आनंदाची गोष्ट असते. त्यांचे फोटो किंवा व्हिडिओ काढून सोशल मीडियावर शेअर करण्याचा मोह अनेकांना होतो. मात्र, याच गोष्टीमुळे वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो. याबाबत सामाजिक कार्यकर्त्या रेखा चौधरी यांनीही वन्यप्राण्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करू नयेत, असे आवाहन केले आहे.

वन्यप्राण्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्यास ते नेमके कोणत्या ठिकाणी दिसले, याची माहिती शिकारी करणाऱ्यांना मिळू शकते. त्यानंतर संबंधित ठिकाणी सापळे रचून या मुक्या जीवांची शिकार होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी वन्यप्राण्यांचे फोटो आणि व्हिडिओ शेअर करताना त्यांचे ठिकाण उघड होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. माथेरानच्या जंगलात पूर्वी मोठ्या प्रमाणात दिसणारे भेकर ससा कालिंदर आता क्वचितच नजरेस पडतात. अनेक लहान-मोठ्या वन्यप्राण्यांची शिकार होत असल्याच्या तक्रारी आहेत. काही ठिकाणी सापळे लावून या मुक्या जीवांना मारले जाते. माकड, वानर, शेकरू, खारुताई, भेकर, घोरपड, मुंगूस, ससा ,विविध जातींचे साप आणि असंख्य पक्ष्यांचा किलबिलाट ही माथेरानच्या जंगलाची खरी संपत्ती आहे. या वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास आणि अस्तित्व टिकवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.गेल्या काही दिवसांपासून माथेरानमध्ये बिबट्याचे दर्शन होत असून त्याचे फोटो आणि व्हिडिओही वारंवार सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. जंगलामध्ये एखादा प्राणी किंवा पक्षी प्रत्यक्ष पाहताना पर्यटकांना जो आनंद मिळतो, तो वेगळाच असतो. उदाहरणार्थ, घरामध्ये पिंजऱ्यात ठेवलेला पोपट पाहणे आणि त्याच पोपटाला जंगलात झाडावर बसलेला किंवा आकाशात मुक्तपणे उडताना पाहणे, या दोन्ही अनुभवांमध्ये मोठा फरक आहे.माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना जंगलात मुक्तपणे बागडणारे वन्यप्राणी, झाडांवर उड्या मारणारे माकड वानर शेकरू, खारुताई, विविध पक्ष्यांचा किलबिलाट आणि निसर्गातील जैवविविधता अनुभवता आली, तर माथेरानच्या पर्यटनाला एक वेगळी दिशा मिळू शकते. पर्यटकांना केवळ डोंगर-दऱ्या आणि हिरवळ पाहण्यासाठीच नव्हे, तर नैसर्गिक अधिवासात वन्यजीवांचे दर्शन घेण्यासाठीही माथेरानला येण्याची उत्सुकता निर्माण होईल. त्यामुळे वन्यजीवांचे संरक्षण करणे ही केवळ निसर्गाप्रती आपली जबाबदारी नसून माथेरानच्या पर्यटनाचे भविष्य समृद्ध करण्याचीही एक संधी आहे.

आदिवासी भागांसह संपूर्ण माथेरान परिसरात वन्यजीव संरक्षणाबाबत प्रबोधन करावे, शिकारीसाठी लावण्यात येणारे सापळे शोधून नष्ट करावेत आणि शिकार करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. माथेरान वन समितीनेही या विषयात सक्रिय भूमिका घेऊन नागरिकांच्या सहभागातून वन्यजीव संरक्षणाची मोहीम राबवावी. स्थानिक नागरिकांसोबतच माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांनीही वन्यजीवांच्या सुरक्षिततेचे भान ठेवणे गरजेचे आहे.वनविभाग, माथेरान वन समिती, सामाजिक संस्था, स्थानिक नागरिक आणि पर्यटक या सर्वांनी एकत्रितपणे वन्यजीव संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली, तर माथेरानची ओळख केवळ पर्यटनस्थळ म्हणून नव्हे, तर वन्यजीवांचे सुरक्षित अधिवास असलेले निसर्ग पर्यटनस्थळ म्हणूनही निर्माण होऊ शकते.

जंगलात प्राणी-पक्षी दिसले की आपल्याला आनंद होतो; हाच आनंद आज आहे तसाच कायमस्वरूपी पुढील पिढ्यांनाही मिळावा, यासाठी त्यांचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. वन्यप्राण्यांचे फोटो काढण्यापेक्षा त्यांचे नैसर्गिक जीवन सुरक्षित ठेवूया. कारण पिंजऱ्यातील प्राणी पाहण्यापेक्षा निसर्गाच्या कुशीत मुक्तपणे बागडणारे वन्यजीव पाहण्याचा आनंद मोठा असतो. हाच आनंद टिकवला, तर माथेरानचे पर्यटनही निश्चितच वाढेल!



शारदीय धून

हिमालयातील पिंढारी ट्रेकच्या वाटेवरील खाती गाव निसर्गरम्य, सुंदर, डोंगरांनी वेढलेले आणि उंच हिरव्या वृक्षराजींत लपलेले. खातीम ध्ये पोहोचण्याआधी खूप खालून डोंगरातून कानावर वाद्यधून येऊ लागली. आधी नुसताच वाऱ्याचा आवाज होता. मग त्यात अस्पष्टसे पहाडी वाद्यसंगीत मिसळू लागले. प्रत्यक्ष स्वर उमटू लागण्याआधी नुसताच एक आभास. वाटले वाऱ्या-पाण्याचा स्वर बोलत आहे. मग डोंगरातून ते सूर वरवर येऊ लागले. दऱ्या-दऱ्या पार करणारे ते वाद्यस्वर ऐकत, वाट पाहत थांबून राहिलो. डोंगरातले गोल गोल रस्ते पार करत ते लोक दृष्टिपथात आले तर लक्षात आले की ती लग्नाची वरात होती. नवरदेव व त्याचे नटलेले बाराती पायीच चालत, चढत वधूच्या गावी लग्नाला जात असावेत. त्यांच्या हातात फुलांचे गुच्छ, माळा. पंधरा-वीस माणसांची ती रंगीत सुंदरशी वरात आमच्या अंगावरून पार पुढे जाईपर्यंत आम्ही थांबून राहिलो, खातीची ती रानधून ऐकत.

मागच्या आठवड्यात 'चांदणऋतु शरद' लिहीत होते, तर अशीच कसलीतरी एक धून कानावर येत असल्याची अस्पष्ट चाहूल लागू लागली. जणू खोल डोंगरातून काहीतरी वाद्य वाजत आहे. आपल्या स्मृतींच्या कुपीतून काय वर येईल सांगता येत नाही. खातीची रानधून आठवली. डोंगरातून वरवर येत जाणारे वाऱ्यावर लहरणारे स्वर. पण आठवणीतले हे ठिकाण, स्वर आणि वेळ सारे वेगळे होते. असाच शरदाचा ऋतू. तोच चंद्रमा नभात. पौर्णिमेचा. पिठूर चांदणे पाण्यावर पसरलेले आणि त्या ऋषीतुल्य दिसणाऱ्या माणसाच्या वाद्यातून निघणारे ते स्वर्गीय सूर! जणू चांदणेच अंगावर झिरपत आहेसे वाटावे. म्हणजे म ागच्या आठवड्यासाठी मी लिहीत होते वेगवेगळ्या पौर्णिमांबद्दल, पण मनात आतल्या बाजूला छेडले जात होते संतूर हे वाद्य!

पण त्याआधी त्या स्थळाची थोडी पार्श्वभूमी सांगितल्याशिवाय मजा नाही. काही वेळा कार्यक्रम ाचे स्थळ, काळ आणि तो कलावंत यांचा असा काही मेळ साधून येतो की ते मानवीयतेची सीमा ओलांडून ईश्वरीय होते, विशेषत: संगीत, वाद्यस्वर यांत अचानक एखादा अलौकिकसा अनुभव पदरात पडतो. तर भोपाळ आहे तलावांचे गाव. एकसे एक बढिया तलाव. अगदी आत्ता हे लिहीत आहे तरी त्या शहरातील कितीतरी तलाव रस्त्या-वाटेच्या कोपरा-वळणांवर नजरेस पडू लागले. पाण्याने मन शांतवते. यातच आहे भोपाळच्या लोकांचा अगदी प्रेमाचा बडा ताल! बडा ताल नावाप्रमाणेच बडा, बडा तालच्या पाण्याचा पुरेपूर उपयोग करीत निसर्ग आणि मानवनिर्मित साधनांची एक सुरेख गुंफण या लोकांनी बडा तालभोवती केली आहे. शहराच्या मध्येच असलेले नैसर्गिक प्राणीसंग्रहालय - वनविहार आणि त्यातले हरणांचे शेकडोंनी कळप, डझनावारी मोर-लांडोर आणि पाणथळ भरगच्च पक्षी. बाजूलाच वसलेल्या मानवसंग्रहालय किंवा भारत भवनसारख्या सुबक सुंदर इमारती. कुठूनही बडा तालचे पाणी नजरेस पडत रहाते. मन त्यातच सुखावते.

याच मानवसंग्रहालयाच्या आवारात, कोजागरी पौर्णिमा साधून असलेल्या पंडित शिवकुमार शर्मा यांच्या संतुरवादनाच्या कार्यक्रमासाठी मी निघाले होते. मानवसंग्रहालयाच्या आवारात पोहोचले तर कळले की कार्यक्रमही खुल्या वातावरणात आयोजित केला आहे. आवार भरून वाहणारे रसिक लोक आणि आसमंत चांदण्यांचाच. वाटेवर इतके मंद दिवे लावलेले की अगदी आपल्या पावलापुरती वाट दिसावी. कार्यक्रमापूर्वीची एक अपेक्षित मंतरलेली सळसळ. पाण्यावर चांदणे. इमारतींवर चांदणे, पायऱ्यांवर चांदणे, आसमंतात शरद ऋतूतली भोपाळची थंड हवा आणि त्या सर्वांपार आभाळात उगवलेला शारदीय पिवळा चंद्र. इतके भारलेपण वातावरणात, की त्यातच कधीतरी पंडितजी आले आणि सर्व काही संतुरमय करून गेले. किती काळ खरंच माहीत नाही! घरी पोहोचले तर दारात पहाट ताटकळत थांबली होती. एकेकदा वाद्य, संगीत हा केवळ एक ऐहिक अनुभव नसतो, तर निसर्गतत्त्वाइतकेच ते स्वर दैवी होऊन आपल्यात झिरपतात.

- राणी दुर्वे

महागाईच्या झळा सोसत साजरी होणारी दिवाळी!

दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा, मांगल्याचा आणि प्रकाशाचा सण! वर्षभरातील कष्ट, चिंता आणि दुःख विसरून चार क्षण आनंदात घालवण्याची संधी म्हणजे दिवाळी. दिवाळीच्या आगमनाने घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. घरांची साफसफाई, रंगरंगोटी, आकाशकंदील, पणत्यांची आरास, फराळाची तयारी, नवीन कपड्यांची खरेदी आणि नातेवाईकांच्या भेटीगाठी यामुळे वातावरण आनंदमय होते. मात्र, यंदाच्या दिवाळीवरही महागाईचे सावट असल्याने सर्वसामान्यांच्या आनंदावर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे महागाईच्या झळा सोसत दिवाळी साजरी करण्याची वेळ सामान्य नागरिकांवर आली आहे.

दिवाळी आली की बाजारपेठा ग्राहकांच्या गर्दीने फुलून जातात. व्यापारी आकर्षक सजावट करतात, विविध वस्तूंवर सवलती जाहीर करतात. ऑनलाइन खरेदीचे पर्यायही उपलब्ध होतात. कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मिठाई, फराळाचे साहित्य, सजावटीच्या वस्तू अशा अनेक गोष्टींची खरेदी केली जाते. मोठमोठ्या मॉलमध्ये ग्राहकांची गर्दी दिसते. मात्र, या झगमगाटाच्या पलीकडे एक वेगळे वास्तव आहे. वाढत्या महागाईमुळे अनेक कुटुंबांना दिवाळीचा खर्च भागवताना आर्थिक तारेवरची कसरत करावी लागत आहे.

साखर, तेल, तूप, डाळी, रवा, मैदा, बेसन, सुकामेवा अशा फराळासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमती वाढल्या आहेत. फळे, भाजीपाला, किराणा माल, दूध आणि मिठाई महाग झाली आहे. त्यातच नवीन कपडे, घराची सजावट, भेटवस्तू आणि इतर वस्तूंच्या खरेदीचा खर्चही वाढला आहे. घराघरांत



दिवाळीचे दिवे लावण्याची इच्छा आहे; मात्र तेलाचे दर परवडत नाहीत. मुलांना नवीन कपडे घ्यावेत असे वाटते; पण हातात पुरेसे पैसे नाहीत. फराळाचे पदार्थ तयार करण्याची इच्छा असते; पण साहित्याच्या वाढलेल्या किमती पाहून गृहिणींचे आर्थिक गणित बिघडते. ही परिस्थिती केवळ ग्रामीण भागापुरती मर्यादित नसून शहरी भागातील मध्यमवर्गीय कुटुंबांनाही महागाईचा मोठा फटका बसत आहे.

विशेषतः रोजंदारीवर काम करणारे मजूर, बांधकाम कामगार, अल्पभूधारक शेतकरी, छोटे व्यावसायिक, खासगी क्षेत्रातील कमी वेतन मिळवणारे कर्मचारी आणि निवृत्तीवेतनावर अवलंबून असणारे ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी दिवाळीचा खर्च पेलणे कठीण झाले आहे. महिन्याचे घरभाडे, वीजबिल, मुलांचे शिक्षण, औषधोपचार, प्रवास आणि किराणा यांचा खर्च भागवतानाच अनेकांची दमछाक होते. अशा परिस्थितीत दिवाळीच्या अतिरिक्त खर्चाची भर पडल्याने त्यांचे आर्थिक नियोजन कोलमडते. उत्पन्न मर्यादित असताना खर्च मात्र सातत्याने वाढत असल्याने सामान्य माणसाने जगायचे तरी कसे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

दिवाळी हा आनंदाचा सण आहे; दिखाव्याचा किंवा अवाजवी खर्चाचा नव्हे. मात्र, समाजात वाढत चाललेली दिखाऊ वृत्ती, महागड्या वस्तूंची खरेदी, प्रतिष्ठेसाठी केली जाणारी अनावश्यक उधळपट्टी याम ुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो. इतरांच्या घरी महागड्या वस्तू आल्या म्हणून आपणही त्या खरेदी कराव्यात, अशी मानसिकता निर्माण होणे योग्य नाही. सण साजरा करताना आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. कर्ज काढून किंवा उधार पैसे घेऊन दिवाळी साजरी करण्यापेक्षा उपलब्ध उत्पन्नात आनंदाने सण साजरा करणे केव्हाही चांगले.

दुसरीकडे, सरकारनेही वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवणे, साठेबाजी आणि कृत्रिम भाववाढ रोखणे, शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देणे तसेच सामान्य नागरिकांची क्रयशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. केवळ सणासुदीच्या काळात सवलती जाहीर करून महागाईचा प्रश्न सुटणार नाही. सर्वसामान्यांच्या उत्पन्नात वाढ होईल आणि जीवनावश्यक वस्तू परवडणाऱ्या दरात उपलब्ध होतील, असे दीर्घकालीन धोरण आखण्याची गरज आहे.

दिवाळीच्या दिव्यांनी प्रत्येकाचे घर उजळले पाहिजे आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलला पाहिजे. मात्र, महागाईमुळे काही घरांमध्ये दिवाळीचा आनंदही चिंतेच्या सावटाखाली हरवताना दिसतो. समाजातील गरीब आणि गरजू घटकांची दिवाळीही आनंददायी व्हावी, यासाठी सक्षम नागरिकांनी मदतीचा हात पुढे करायला हवा. दिवाळीचा खरा आनंद महागड्या खरेदीत किंवा रोषणाईत नसून म णुसकी, आपुलकी, प्रेम आणि समाधानात आहे. महागाईच्या काळात काटकसरीने, नियोजनपूर्वक आणि सामाजिक भान राखून दिवाळी साजरी करणे ही काळाची गरज आहे. दिवाळीचा प्रकाश केवळ श्रीमंतांच्या घरातच नव्हे, तर समाजातील शेवटच्या घटकाच्या घरातही पोहोचला, तरच दिवाळीचा खरा अर्थ सार्थ ठरेल!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

दिवाळीला मातीच्याच पणत्या लावूया !

दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपल्याने बाजारपेठा रंगीबेरंगी कंदील, पणत्या, विजेची तोरणे, रांगोळीचे रंग यांनी सजल्या आहेत. जीवनातील निरुत्साह, निराशा आणि नकारात्मकतेच्या अंधकाराकडून उत्साहाच्या, चैतन्याच्या आणि सकारात्मकतेच्या प्रकाशाकडे जाण्याचा संदेश देणाऱ्या दीपावली सणाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. दिवाळीला दीपावली असेही म्हटले जाते. दीपावली म्हणजे दिव्यांची रांग. दिवाळी खरेतर दिव्यांचा उत्सव. दिवाळीत मातीच्या पणत्यांमध्ये तेलाची वात लावून दारात दोन्ही बाजूंना, दारात काढलेल्या रांगोळीजवळ



आणि तुळशीजवळ त्या ठेवल्या जातात. पूर्वी दारासमोर टांगलेल्या आकाशकंदिलातही मातीची पणती लावत. कालानुरूप यामध्ये बदल होत गेला आणि मातीच्या पणतींची जागा हळू हळू विद्युत दिव्यांनी घेण्यास सुरुवात केली आहे. पणतीसारखे दिसणारे लुकलुकणारे दिवे बाजारात मिळू लागले आहेत. सेल किंवा विद्युत प्रवाहावर चालणारे हे दिवे प्रकाश देत असले तरी पणत्यांमधून प्रक्षेपित होणारी सात्विकता यामध्ये नाही. विजेच्या कृत्रिम दिव्यांमुळे मातीचे दिवे बनवणारी आणि ती विकणारी गोरगरीब मंडळी यांच्यावर संक्रांत येऊ लागली आहे. मातीच्या दिव्याची सर या निर्जीव दिव्यांना कशी येणार ? त्यामुळे या लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या मोहात न पडता दिवाळी सणामागील शास्त्र लक्षात घेऊन मातीच्या पणत्याच खरेदी कराव्यात. जेणेकरून त्या विकणाऱ्या आणि बनवणाऱ्या गरिबांच्या घरातही दिवाळी साजरी होईल.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

महाकुंभ

महाकुंभ स्नानसिध्दी
हटता हटेना ती गर्दी
सशध्द भाविक कमी
दिखाऊ असेल अर्धी

साधु संत सात्विक ते
प्राप्तज्या खरीसिध्दी
भाव भक्ती ओसंडली
नदी समान मनशुध्दी

शास्त्रशुद्ध आवर्तने रे
जाणकारं स्थीर बुध्दी
शिस्त लावावी गर्दीले
मातेअन्यथाअनागोंदी

बांधूनटाके साखळ्या
काहीवेळेला आजादी
बोलून जाई खूपकाही
प्रक्रिया कधी निशब्दी

प्रदुषित करी समारोह
येतातजेव्हा खळवादी
वैयक्तिक जे मत भेदी
उफाळू येते वादावादी

बदनाम होई महोत्सव
हतबल ती खाकीवर्दी
अ घटीत घडते घटना
उशिरा मिळते रे वरदी

कुंभमेळा हो सुसंपन्न
जशी गळे मनअशुध्दी
विनंती परमेश्वरा तुज
सज्ञान होई बालबुध्दी

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

कुंभमेळा : दुष्काळग्रस्त महाराष्ट्राला आर्थिक संजीवनी

महाराष्ट्र सरकारने नाशिक येथील कुंभम ेळ्याच्या निमित्ताने तेथील पायाभूत सुविधांसाठी तब्बल ₹२२,४२५ कोटी ते ₹३५,००० कोटी पर्यंतचा भव्य विकास आराखडा जाहीर केला आहे. तेव्हापासून महाराष्ट्रात दुष्काळ असताना, कुंभमेळ्याची गरजच काय? तो रद्द करा आणि ते पैसे शेतकऱ्यांमध्ये वाटा असा सूर काही जण आळवत आहेत. खरेतर हा कुंभमेळा दुष्काळ आणि आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या उत्तर महाराष्ट्रासह संपूर्ण राज्यासाठी एक मोठा आर्थिक आधार ठरणार आहे. यूट्यूबवरील उत्तरप्रदेश कुंभमेळ्याच्या डॉक्युमेंट्रीज आणि प्रसारमाध्यमांचे कव्हरेज पाहिले, तर कुंभम ेळ्याची अफाट आर्थिक ताकद स्पष्ट दिसते. दुष्काळानंतरच्या काळात होणारा हा महासोहळा महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेतही प्राण फ ुंकण्याचे काम करू शकतो.

वस्तुत: महाराष्ट्रात जेव्हा जेव्हा मोठ्या आर्थिक उलाढालीची, विकासाची किंवा मोठ्या गुंतवणुकीची चर्चा होते, तेव्हा प्रकाशझोत प्रामुख्याने मुंबई-पुणे या दोनच शहरांवर पडतो. राज्याचे संपूर्ण अर्थकारण याच पट्ट्यात फिरत असल्याचे चित्र नेहमी दिसते. मात्र, या पारंपरिक परिघाबाहेर पडून यावेळी विचार केला गेला आहे असे वाटतेय. आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा पर्व ३१ ऑक्टोबर २०२६ ते २०२८ पर्यंत असणार आहे.

कुंभमेळ्यात देशभरातून आणि जगभरातून कोट्यवधी भाविक, पर्यटक आणि साधू-संत दाखल होतात. मुख्य पर्वणीचा २० ते २५ दिवसांचा काळ हा अर्थकारणाचा सर्वो च्च बिंदू असतो. या काळात बाजारात निम र्ण होणारी रोकड आणि मागणी इतकी प्रचंड असते की, स्थानिक पुरवठादार आणि व्यापारी यांना दोन वर्षांचा नका केवळ एका महिन्यात



होऊ शकण्याचे अंदाज तज्ज्ञ वर्तवत आहेत.या महोत्सवाचे अर्थकारण थेट तळागाळापर्यंत झिरपते. वाहतूक क्षेत्रातील रिक्षा व टॅक्सी चालकांना चोवीस तास ग्राहक मिळतील; हॉटेल, लॉज आणि छोट्या खाणावळी हाऊसफ ुल राहतील; तर चपला, कपडे, पाण्याच्या बाटल्या, पूजा साहित्य, पालेभाज्या आणि पेट्रोल पंप चालकांपासून ते गॅरेज चालकांपर्यंत प्रत्येक घटकाचा व्यवसाय तेजीत चालेल. एकाही घटकाला वगळता येणार नाही, असा हा सर्वसमावेशक नफा असेल.

दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी व्यवसायाचे अनेक पर्याय आहेत.केवळ शेतीवर किंवा पावसावर अवलंबून न राहता शेतकऱ्यांच्या मुलांनी आतापासूनच या २५ दिवसांचे व्यावसायिक नियोजन करणे आवश्यक आहे. कमी भांडवलात ते खालील व्यवसाय सुरू करू शकतात:

१. शेतमाल आणि भाजीपाल्याचा थेट पुरवठा : विविध आखाडे, अन्नछत्रे आणि तात्पुरत्या खाणावळींना शेतातून थेट बटाटे, कांदे, टोमॅटो आणि पालेभाज्यांचा घाऊक पुरवठा करणे.

२. फिरते अन्न व पारंपरिक पेये : शहरात फिरती वाहने किंवा स्टॉल लावून ज्वारीची भाकरी-पिठलं, ताक, लिंबू सरबत किंवा उसाचा रस यांसारख्या आरोग्यदायी खाद्यपदार्थांची विक्री.

३. पूजा साहित्य व फुलांचे पॅकेजिंग : झेंडूची फुले, बेल, तुळस आणि पूजेच्या साहित्याची आकर्षक पाकिटे बनवून गोदावरी घाट आणि कुशावर्त कुंड परिसरात थेट विक्री.

४. ग्रामीण निवास व्यवस्था (अग्रो-टुरिझम/होमस्टे) : शहराबाहेरील आपल्या शेतात किंवा मोकळ्या जागेवर शहराच्या गजबजाटापासून दूर राहू इच्छिणाऱ्या भाविकांसाठी तंबू (टेंट) किंवा साध्या खोल्यांची राहण्याची सोय.

५. मोबाईल चार्जिंग व क्लोकरूम सुविधा : लाखो भाविकांच्या सोयीसाठी बसस्थानके आणि मुख्य मार्गांवर बॅगा ठेवण्यासाठी सुरक्षित क्लोकरूम आणि पॉवर बँक/चार्जिंग स्टेशन सुरू करणे.

६. स्थानिक हस्तकला व उत्पादनांचे स्टॉल्स : नाशिकचे बेदाणे, स्थानिक प्रक्रिया केलेले पदार्थ किंवा ग्रामीण हस्तकलेच्या वस्तूंचे तात्पुरते प्रदर्शन व विक्री.

महत्वाची गोष्ट म्हणजे कुंभमेळा सरकार आयोजित करत नाही. ठरलेल्या तिथीला लाखो भाविक कोणाच्याही निमंत्रणाशिवाय तिथे दर्शनाचा लाभ घेण्यासाठी येतात. त्यांचे नियोजन करणे आणि स्थानिकांना अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी उपाययोजना करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे. सिंहस्थ कुंभमेळा हा स्नानाचा आणि धार्मिक विधींचा सोहळा तर आहेच सोबत तो दुष्काळग्रस्त भागाच्या अर्थव्यवस्थेला उभारी देणारा महा-उत्सव ठरू शकतो. ग्रामीण तरुणांनी या संधीचा अचूक अभ्यास करून नियोजनबद्ध पावले उचलली, तर हा कुंभमेळा त्यांच्या आर्थिक प्रगतीचा भक्कम पाया ठरेल.

- सौ.स्वाती हरेर

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

सहाय्यक शिक्षक चंद्रकांत मोहोड व वरिष्ठ लिपिक यामिनी घोरमाडे यांना भावपूर्ण निरोप



अक्षराज : दिवाकर घेर

दि.०१, नागपूर : खापरखेडा वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण व कनिष्ठ महाविद्यालयाचे सहाय्यक शिक्षक चंद्रकांत मोहोड व वरिष्ठ लिपिक यामिनी घोरमाडे सेवानिवृत्त झाल्यामूळे त्यांना दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी भावपूर्ण निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराविमं कर्मचारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ईश्वर राऊत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक गणेश चिखले, सुनील जालंदर, संध्या ठाकरे, किशोर बक्सरिया, पुष्पा जथे, प्रशांत जालंदर, माजी मुख्याध्यापक विमलप्रकाश मिश्रा, नंदा घाटे, वीणा पांडे, राम बांते, मुख्याध्यापिका रजनी गजभिये, संध्या मोहोड, क्रिष्णा टिचकुले, रेखा शर्मा, कृष्णा सूर्यवंशी आदी मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती मातेच्या प्रतिमेला माल्यार्पण करून द्विप प्रज्वलित करण्यात आले.

याप्रसंगी संस्था, शाळा व शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेच्या वतीने चंद्रकांत मोहोड व यामिनी घोरमाडे यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सहपत्नीक सत्कार करण्यात आला.सत्काराला उत्तर देतांना चंद्रकांत मोहोड व यामिनी घोरमाडे यांनी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याचे सांगितले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.कार्यक्रमाचे संचालन कैलाश तभाने आभार नीरज मिश्रा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेखा चिखले, संगीता राऊत, ममता अंजनकर, चंद्रकांत गायकवाड, सचिन कोरडे, प्रवीण साबळे, राजेंद्र गुळरांधे, उमेश झाडे, गीता जालंदर, पुष्पा बढिये, मनीषा नखाते, प्रमोद इंगळे, अनिल भास्कर, अभय मिश्रा, भोला बक्सरिया, किशोर निकोसे, शोभा घोडीले, विवेक खन्नाडे यांनी सहकार्य केले.

सरदार पटेल जयंतीनिमित्त वादविवाद स्पर्धा; दीपाली गमेने पटकावला प्रथम क्रमांक



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०१, चंद्रपूर : मेरा युवा भारत (युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार), चंद्रपूर व उडान द करिअर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकता दिवस व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा उडान द करिअर अकॅडमी, तुकूम, चंद्रपूर येथे पार पडली. या स्पर्धेत दीपाली गमे हिने प्रथम, खुशी देवाडकर हिने द्वितीय, तर वेदिका चेरपुरे हिने तृतीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कौशल्य, वैचारिक देवाणघेवाण, चिकित्सक विचारसरणी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाला जितेंद्र पिंपळशेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मेरा युवा भारत, चंद्रपूरचे ॲड. देवा पाचभाई उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून सामाजिक कार्यकर्त्या कोमल मोहितकर यांनी काम पाहिले. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळाली. राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशाची एकता, अखंडता आणि लोकशाही मूल्यांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

वेदिका इंगोलेला राज्यस्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत कांस्यपदक



अक्षराज : दिवाकर घेर

दि.०१, नागपूर : सेंट अँन्स इंग्लिश मीडियम स्कूल, दहेगाव (रं.) येथील विद्यार्थिनी वेदिका खुशाल इंगोले हिने राज्यस्तरीय शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धा २०२६-२७ मध्ये कांस्यपदक पटकावून शाळेचे नाव उज्ज्वल केले. ही स्पर्धा दिनांक २९ ते ३१ ऑक्टोबर २०२६ दरम्यान जालना येथील जिल्हा क्रीडा संकुलात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत वेदिकाने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरावर कांस्यपदक मिळविले. विशेष म्हणजे, तलवारबाजीच्या सांघिक प्रकारातील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर मुलींच्या गटात नागपूर विभागाने ओव्हरऑल ट्रॉफी पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. वेदिकाच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर क्लिओफस, व्यवस्थापक सिस्टर सिरिया पुष्पम, उपमुख्याध्यापिका सिस्टर प्रीती, क्रीडा विभाग प्रमुख खुशाल इंगोले, क्रीडा शिक्षक प्रतीक उमप, सिद्धार्थ माघाडे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंदांनी तिचे अभिनंदन करून पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

श्री संत संताजी जगनाडे महाराज तेली समाज कल्याणकारी महिला मंडळाची कार्यकारिणी गठित



अक्षराज : नितीन पाटील

दि.०१, चिमूर (चंद्रपूर) : तेली समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती चिमूर येथे मोठ्या थाटामाटात साजरी होत असते त्यासाठी चिमूर येथील महिलांनी मंडळ बनवून कार्यकारणी तयार करून कार्यक्रमांचे नियोजन केले आहे. चिमूर शहरातील संत शिरोमणी श्री संत संताजी जगनाडे महाराज महिला मंडळ चिमूर यांच्या पुढाकाराने महिलांच्या विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. याप्रसंगी पुष्पा किशोर हरणे, राधा राजेश जुमडे, ज्योत्सना रमेश लांजेवार, मिनाक्षी संतोष बंडे, डॉ.शालीनी सुरेश लाखे, तृप्ती किशोर कमडी, स्मिता प्रभाकर पिसे, प्रणिता विनोद पिसे, शृतिका भरत बंडे, शिल्पा श्रीरंग पिसे, माधवी अगडे, वैष्णवी सागर गोठे, विद्या प्रमोद भटगरे, माधुरी प्रविण कावरे, मेघा संजय कामडी, माधुरी पितांबर पिसे, माधुरी सचिन पिसे, भारती नरेन्द्र राजुरकर, सिमा संतोष गोहणे, मंगला प्रमोद बंडे, माधुरी प्रविण सातपुते, भारती भाष्कर बावणकर आदी मंडळीच्या उपस्थितीत कार्यकारिणी गठित करण्यात आली.

लातूरच्या कुरिअरमध्ये नेमकं काय होतं?; पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचा मोठा खुलासा

लातूरमध्ये कुरिअर टेम्पोतील पार्सलचा स्फोट; दोघे किरकोळ जखमी, पार्सल काढताना एक जण गंभीर जखमी

अक्षराज : आदित्य चिकटे

दि.०१, लातूर : लातूर शहरात सकाळी साडेदहाच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या कुरिअरच्या टेम्पोतील पार्सलचा स्फोट झाल्याची घटना घडली.

या घटनेत दोन व्यक्ती किरकोळ जखमी झाल्या, तर पार्सल काढताना एक व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची माहिती पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी दिली.



एअर पिस्टलच्या डिलिव्हरीचा प्राथमिक अंदाज

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात संबंधित पार्सलमध्ये एअर पिस्टल असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, पार्सल मधील सर्व साहित्य जप्त करून त्याचे विश्लेषण केल्यानंतरच स्फोटाचे नेमके कारण स्पष्ट होईल.

सीसीटीव्ही फुटेजसह सर्व बाजूंनी तपास

या घटनेच्या तपासासाठी पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून सर्व पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे.

कुरिअर कोणी पाठवले, ते कोणासाठी होते आणि त्यामध्ये नेमके कोणते साहित्य होते, याची सखोल चौकशी करण्यात येणार असल्याचे अमोल तांबे यांनी सांगितले.

स्फोटाचे नेमके कारण आणि त्यामागील परिस्थिती तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

जिजाऊंच्या संस्कारांतून घडले शिवराय; कृष्णनीतीतून उभारले हिंदवी स्वराज्य !

डॉ. शिवरत्न शेटे यांचे प्रतिपादन; शिव प्रबोधनाच्या तिसऱ्या पुष्पाला सोलापूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अक्षराज : साहेबराव परबत

दि.०१, सोलापूर : राष्ट्रमाता जिजामातांनी बाल शिवरायांवर रामायण आणि महाभारतातील आदर्श घटनांचे संस्कार केले. याच संस्कारांच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची उभारणी केली.

छत्रपती शिवरायांचे संपूर्ण जीवनचरित्र हे कृष्णनीतीचे सर्वोत्तम उदाहरण असल्याचे प्रतिपादन हिंदवी परिवाराचे प्रमुख शिवव्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांनी केले.हिंदवी परिवाराच्या वतीने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सोलापूरच्या भुईकोट किल्ल्यात आयोजित करण्यात येणाऱ्या 'शिव प्रबोधन' व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पात ते बोलत होते. यावेळी 'जिजामातांचे संस्कार' या विषयावर त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या व्याख्यानाला सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर हिंदवी परिवाराचे राज्य उपाध्यक्ष गुरुशांत धुत्तरगावकर यांनी शिवचरित्रातील काही भागाचे वाचन केले. यानंतर डॉ. शेटे यांनी जिजामातांच्या संस्कारांचे महत्त्व विशद केले.

डॉ. शेटे म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीतही राजमाता जिजाऊ आणि महाराणी येसूबाई यांनी अनुक्रमे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शाहू महाराज यांच्यावर उत्तम संस्कार केले. जिजामाता नसत्या तर बाल शिवबा छत्रपती शिवाजी महाराज झालेच नसते. आजच्या मातांनी मुलांना केवळ कार्टून दाखवण्याऐवजी श्रीराम, श्रीकृष्ण आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र शिकवावे. मुलांना मातीत खेळण्याची, अहंकारमुक्त जीवन जगण्याची आणि उत्तम संस्कारांची शिकवण द्यावी. मातृशक्तीने ठरविले तर भारत नक्कीच



महासत्ता होऊ शकतो.शिवचरित्राचा अभ्यास करताना कवींद्र परमानंद नेवासकर लिखित 'शिवभारत', 'जेधे शकावली' आणि 'सभासद बखर' या ऐतिहासिक ग्रंथांचे वाचन तरुणांनी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

सध्याच्या बदलत्या जीवनशैलीवर भाष्य करताना त्यांनी वाढदिवस साजरा करण्याच्या पद्धतीत भारतीय संस्कृतीचे भान राखण्याचे आवाहन केले. केक कापण्याऐवजी पंचारतीने ओवाळून आणि कुंकुमतिलक लावून वाढदिवस साजरा करावा, असे ते म्हणाले. सिग्नल न तोडणे, हेल्मेट परिधान करणे, रस्त्यावर न थुंकणे यांसारख्या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींमधूनही समाजात शिस्त आणि संस्कार रुजतात. अशा सकारात्मक बदलांतूनच देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करेल. यंदाच्या दिवाळीत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याचे आवाहन ही त्यांनी केले. संपूर्ण वंदे मातरम् गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाला ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार नरसिंग मेंगजी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अमोलराजे भोसले, सुयश गुरुकुलचे केशव शिंदे, नगरसेवक अमोल बापू शिंदे, विनोद दादा भोसले, नगरसेविका सुनिताताई कामाठी, नगरसेवक शिवाजी तात्या वाघमोडे, नगरसेविका विजयाताई खरात, नगरसेवक सात्विक बडवे, लेबर फेडरेशनचे चेअरमन शंकर अण्णा चौगुले, संभाजी आरमारचे संस्थापक श्रीकांत बापू डांगे, महेश धाराशिवकर, बाळासाहेब गायकवाड, सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत पाटील, जी. के. देशमुख, अर्चनाताई आशुतोष बरडे, श्रुती माने, दत्ता गणेशकर, राजू हौशेट्टी, आतिश शिरसट, विजय पोखरकर, निलिमाताई शितोळे, सचिन गंधुरे आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हिंदवी परिवाराचे शहर प्रमुख तुषार आवताडे, डॉ. सुप्रज्ञा शेटे, सिद्धेश्वर टेंगळे-स्वामी, राम वाकसे, प्रसाद खोबरे, सिद्धेश्वर घोडके, विनायक दुदगी, गणेश होटकर, तुकाराम चाबुकस्वार, तिप्पय्या हिरेमठ, दत्ता सनके, साहेबराव परबत, विकास शिंदे, महेश जगताप, विजय पोखरकर, ओम धुत्तरगावकर, राहुल बिराजदार, आशुतोष पवार आणि ओंकार जाधव यांनी परिश्रम घेतले.चौकटशिव प्रबोधनला सोलापूरकरांची तुडुंब गर्दी!शिव प्रबोधन व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पाला रविवारी सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शिक्षण, विधी, आरोग्य, साहित्य, इतिहास, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह शिवप्रेमींनी व्याख्यानाला गर्दी केली होती. दिवसेंदिवस शिव प्रबोधन व्याख्यानमालेला मिळणारा प्रतिसाद वाढत असून, या उपक्रमात अधिकाधिक सोलापूरकरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अमरावती विभागात यशस्वी करावे - विभागीय आयुक्त नयना गुंडे



अक्षराज : प्रतिनिधी

दि.०१, अमरावती : लोकसहभाग वाढवून व नवीन शासन निर्णयातील निकषांचे तंतोतंत पालन करून अमरावती विभागातील जास्तीत जास्त ग्राम पंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषदा स्पर्धेमध्ये पात्र होतील यासाठी सर्व यंत्रणा व यंत्रणांच्या अधिकारी-कर्मचारी यांनी परिश्रम घ्यावेत व समन्वयाने अमरावती विभागात मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान यशस्वी करावे असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले.

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाबाबत अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली विभागातील पाचही जिल्ह्यांतील जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक व सर्व तालूक्यांचे गट विकास अधिकारी यांच्यासाठी शुक्रवारी विभागीय कार्यशाळेचे दुरदृष्यप्रणालीव्दारे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या.

या कार्यशाळेत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाबाबत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या नवीन आलेल्या ११ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयातील सुशासन पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृध्द गाव, स्वच्छ व हरीत गाव, योजनांचे अभिसरण, संस्था बळकटीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय तसेच लोकसहभाग आणि श्रमदान या आठ घटकांवर या कार्यशाळेत सविस्तर मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयाच्या नियोजनाचे यावेळी सादरीकरण केले. तसेच विभागातील प्रत्येक जिल्हयातून दोन पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांनी पंचायत समित्यांच्या नियोजनाचे सादरीकरण केले.

राज्यातील आरोग्य सेवांमध्ये गुणात्मक सुधारणा करणे, प्रत्येक नागरिकाला आरोग्याच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजाराचे प्रमाण कमी करून त्याचे निर्मूलन करणे आणि माता व बालकांचे आरोग्यमान उंचावणे, या मुख्य उद्देशाने राज्य शासनाने ग्राम पातळीवर विकासाची नवी दिशा ठरविणारे एक प्रभावी अभियान आणले आहे.

शासनाच्या प्रजा निरोगी, तर राज्य सशक्त या तत्त्वज्ञानावर आधारीत, गावांमधील नागरिकांना सुदृढ आणि सशक्त बनवण्यासाठी, माझं गाव, आरोग्य संपन्न गाव हे अभियान राज्यात सुरु करण्यात आले आहे.शासनाने निर्देश दिल्यानूसार सर्व ग्रामपंचायती व आरोग्य संस्थांनी अभियानात सक्रीय सहभागी व्हावे व प्रभावीपणे कामगिरी करावी असे आवाहनही श्रीमती गुंडे यांनी यावेळी केले.

पीएमपीएमएलच्या सतर्क चालक-वाहकामुळे प्रवासी महिलेच्या मदतीसाठी धावली बस

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०१, पुणे : पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) चालक व वाहकाने दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे बसमधून प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या मदतीसाठी तातडीने वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्यात आली.

कर्तव्यापलीकडे जपली माणुसकी!हडपसर रेल्वे स्टेशन ते पुणे



रेल्वे स्टेशन दरम्यान धावणाऱ्या 'रात्र राणी' बस क्रमांक ५/१ मध्ये रात्री १२:३० वाजण्याच्या सुमारास विशाखा सुधाकर गवई यांची अचानक प्रकृती खालावली. ही बाब लक्षात येताच बसचे कायम वाहक गोरखनाथ चव्हाण (बॅच क्र. ४९७३) आणि कायम चालक राजेंद्र निकम (बॅच क्र. ४६६६) यांनी प्रसंगावधान राखत तातडीने बस थेट ससून रुग्णालयाच्या आवारात नेली.तेथे संबंधित महिलेला डॉक्टरांच्या मदतीने आपत्कालीन विभागात दाखल करून उपचारांसाठी वैद्यकीय पथकाच्या स्वाधीन करण्यात आले. त्यानंतर चालक व वाहकाने इतर प्रवाशांचीही जबाबदारी सांभाळत बस पुढील मार्गावर रवाना केली.

पीएमपीएमएलच्या चालक-वाहकाने दाखविलेली ही तत्परता म्हणजे केवळ कर्तव्यपूर्ती नसून, संकटाच्या वेळी माणुसकीला दिलेले प्राधान्य आहे. त्यांच्या या संवेदनशील आणि कौतुकास्पद कार्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित झाली आहे.

आ.अडबाले यांच्या पुढाकाराने मंत्रालयातील बैठकीत विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करा



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०१, चंद्रपूर : राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेतील (आरएनपीएस) विविध त्रुटी दूर करण्याबाबत दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. वित्त विभागाच्या (लेखा व कोषागारे) प्रधान सचिव डॉ.रिचा बागला यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला आ. सुधाकर अडबाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत रविवार, दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व एनपीएस/डीसीपीएस धारक कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, ही प्रमुख मागणी करण्यात आली. सदर विषय धोरणात्मक असल्याने याबाबतची सकारात्मक भूमिका मंत्री महोदयांकडे मांडण्यात येईल, असे प्रधान सचिव डॉ. रिचा बागला यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रातील अनुकंपा नियुक्तीधारक कर्मचाऱ्यांना, ज्यांनी १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्तीसाठी अर्ज केला होता; मात्र, प्रत्यक्ष नियुक्ती त्यानंतर झाली, अशा पात्र कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच वस्तीशाळा शिक्षकांची सन २००२ पासूनची कंत्राटी सेवा ग्राह्य धरून त्यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ देणे, सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला ५० टक्के दराने कुटुंब निवृत्तिवेतन मिळण्यासाठी असलेली किमान सात वर्षांच्या सलग सेवेची अट रद्द करणे, आरएनपीएस मधील कर्मचाऱ्यांच्या १० टक्के अनिवार्य अंशदानाच्या जाचक अटींमध्ये सुधारणा करणे, तसेच मूळ नियुक्ती दिनांकापासून अंशदानासाठी सेवा गणना करणे, आदी मागण्या मांडण्यात आल्या.

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना ५० टक्के पेन्शनसाठी ओपीएसप्रमाणे अंशदान कपातीचा कालावधी निश्चित करणे, भविष्यातील वेतन आयोगाचे लाभ आरएनपीएस मध्ये लागू करणे, ओपीएस प्रमाणे वाढीव कुटुंब निवृत्तिवेतनाचा लाभ देणे, स्वेच्छानिवृत्ती (व्हीआरएस) बाबत स्पष्ट नियम व मार्गदर्शक सूचना जारी करणे आणि निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.

याशिवाय डीसीपीएस/एनपीएस लागू करण्यात झालेला विलंब किंवा प्रशासकीय दिरंगाईमुळे अंशदान कपात न झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी संरक्षणात्मक तरतूद करणे, किमान ७,५०० रुपये निवृत्तिवेतनाबाबतच्या विसंगती दूर करणे, एनपीएस मधून संचित निधीतील २५ टक्के रक्कम घेतलेल्या कर्मचाऱ्यांना १० टक्के व्याजासह रक्कम जमा करण्याची अट रद्द करणे, सेवेदरम्यान मृत्यू अथवा रुग्णतेमुळे सेवा समाप्त झालेल्या कर्मचाऱ्यांना ओपीएस प्रमाणे संरक्षणात्मक निवृत्तिवेतन लाभ देणे, वयाची ८० वर्षे पूर्ण झाल्यानंतर वाढीव निवृत्तिवेतनाचा लाभ देणे तसेच आरएनपीएस मध्ये १० वर्षांची किमान सेवा पूर्ण नसलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही पेन्शनचा लाभ देणे, या मागण्यांवरही सविस्तर चर्चा झाली.

या सर्व मागण्यांवर प्रधान सचिव डॉ. रिचा बागला यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. संबंधित मागण्यांचा सखोल अभ्यास करून वित्त विभागाकडून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील कर्मचाऱ्यांनी आयुष्यभर आपले कर्तव्य बजावत असताना त्यांच्या वेतनातून अंशदान जमा केले आहे. मात्र, या योजनेत त्यांना त्यांच्या हक्काचा आणि उचित पेन्शन लाभ मिळत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या हितासाठी शासनाने कोणतीही तडजोड न करता सरसकट जुनी पेन्शन योजनाच लागू करावी, अशी स्पष्ट भूमिका आ. सुधाकर अडबाले यांनी बैठकीत मांडली.

या बैठकीला आ. रामदास मसराम, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर, राज्य सचिव गोविंद उगले, राज्य कार्याध्यक्ष आशुतोष चौधरी, राज्य कोषाध्यक्ष मिलिंद सोळंके, राजेंद्र ठोकळ, गडचिरोली जिल्हाध्यक्ष गुरुदेव नवघडे, नाना गाढवे, प्रविण झावरे, किरण निंबाळकर, विनायक चौथे, भाऊसाहेब घाडगे, वैशाली गिरी तसेच वित्त विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

थोडक्यात बातम्या

आ. देवतळे यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद शाळांना डिजिटल शिक्षणाची भेट



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०१, वरोरा (चंद्रपूर) : वरोरा विधानसभा क्षेत्रातील ३५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना आमदार करण देवतळेयांच्या पुढाकारातून जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीअंतर्गत ८० लाख रुपयाचे ई-लर्निंग संच उपलब्ध करून देण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक तालुका शाखा भद्रावती व वरोरा यांच्या वतीने आ. करण देवतळे यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी आ. करण देवतळे यांनी वरोरा विधानसभा क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळा डिजिटल करण्यासाठी यापुढेही सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे आश्वासन दिले. डिजिटल शिक्षणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होतील.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिकचे विभाग कार्यवाह विलास बोबडे, जिल्हाध्यक्ष अमोल देठे, जिल्हा कार्यवाह विलास खाडे, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र पांडे, सतीश डांगरे जिल्हा प्रतिनिधी, वरोरा तालुकाध्यक्ष संचित जांभुळे, विकास तुरारे, रमेश वाकडे, सचिन जांभुळे, दिगंबर खुळसंगे, रंगनाथ मत्ते, प्रशांत कोल्हे, संदीप गराटे,विकास तुरारे, नितेश भोवरे, विलास मेश्राम, सागर कनोजवार, सदाशिव पाल, मनोज नन्नावरे, नितीन नन्नावरे, बाबाराव वाकडे, संजय बुरुले, अतुल झोटिंग यांच्यासह शिक्षक परिषद पदाधिकारी उपस्थित होते.

असोरे सुपुत्र शुभम निंबकर यांना हाँगकाँग येथे आंतरराष्ट्रीय 'यंग सायंटिस्ट' पुरस्कार

अक्षराज : उदय दणदणे

दि.०१, असोरे (गुहागर) : गुहागर तालुक्याचे नाव सातासमुद्रापार नेणारी अभिमानास्पद बातमी...! असोरे गावचे सुपुत्र शुभम महेंद्र निंबकर यांना फूड सायन्स क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या 'इंटरनॅशनल युनियन ऑफ

फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी (IUFoST)' या संस्थेतर्फे प्रतिष्ठेचा 'यंग सायंटिस्ट' पुरस्कार दि.२९ ऑक्टोबर २०२६ रोजी हाँगकाँग येथे प्रदान करण्यात आला.

शेतकऱ्याच्या बांधावरून थेट आंतरराष्ट्रीय संशोधनाच्या पटलापर्यंत हा प्रवास थक्क करणारा आहे

शुभम यांनी फूड इंजिनिअरिंग क्षेत्रात केलेले संशोधन हे शेतकरी हिताचे आणि काळाची गरज ओळखणारे आहे. अन्नपदार्थांमधील सूक्ष्म पोषक घटकांचे जतन, अन्नाचे पोषणमूल्य वाढवणे आणि सर्वात महत्त्वाचे



असोरे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा!

म्हणजे सीताफळाच्या सालीसारख्या टाकाऊ समजल्या जाणाऱ्या कृषी कचऱ्यापासून मौल्यवान अर्क तयार करून त्याचे स्प्रे ड्रायिंग आणि फ्रीझ ड्रायिंग तंत्रज्ञानाद्वारे मूल्यवर्धन करण्याचे त्यांचे संशोधन जागतिक पातळीवर कौतुकास्पद ठरले आहे. 'कचऱ्यातून संपत्ती' ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली आहे.

ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या एका तरुणाने चिकाटी, मेहनत आणि संशोधनाच्या बळावर मिळवलेले हे यश गुहागर तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांसाठी दिपस्तंभ आहे.

शुभम हे असोरे गावचे प्रगतशील शेतकरी महेंद्र निंबकर आणि असोरे गावच्या कर्तव्यदक्ष माजी सरपंच मधुरा महेंद्र निंबकर यांचे सुपुत्र आहेत. आई-वडिलांनी दिलेले संस्कार आणि गावाने दिलेली ओळख त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावली आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल असोरे ग्रामपंचायत, सर्व ग्रामस्थ आणि गुहागर तालुकावासीयांकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन सह पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

मोकाट कुत्र्यांनी दुचाकीस्वारावर झेप घेवून बालकाला चावा घेतला; सोयगाव शहरातील घटना



अक्षराज : पूनम परदेशी

दि.०१, सोयगाव (छ.संभाजीनगर) : मुलासह दुचाकीवरून जात असताना मोकाट कुत्र्याच्या कळपाने घेराव घालून बिथरलेल्या अवस्थेत दुचाकी स्वार खाली पडून दहा ते बारा मोकाट कुत्र्यांपैकी दुचाकी मध्ये अडकलेल्या तीन मोकाट कुत्र्यांनी लहान बालकाला चावे घेवून गंभीर जखमी केल्याची घटना दि.३० ऑक्टोबर रोजी दुपारी सोयगाव शहरात घडली दरम्यान तातडीने त्या लहान बालकाला सोयगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी जळगावला हलविले आहे.

गृह रक्षक दलाचे जवान दीपक घन हे आपल्या दुचाकी ने सोयगाव वरून गलवाडा गावाकडे जात असताना रस्त्यावर बसलेल्या १० ते १२ मोकाट कुत्र्यांनी दुचाकी वर धाव घेतली या प्रकारामुळे दीपक घन बिथरून दुचाकी सह खाली कोसळून त्यांच्या दुचाकी मध्ये अडकलेल्या तीन कुत्र्यांनी त्यांचा मुलगा शिवाश दीपक घन (वय २) यास गंभीर चावे घेवून जखमी केले तर दिपक घन यांनाही चावा घेतला दरम्यान या झालेल्या अपघातात दीपक घन यांना डोक्याला किरकोळ मार लागला. दरम्यान कुत्र्यांच्या तावडीतून शिवाश घन ची नागरिकांनी सुटका करून त्याला सोयगाव येथील ग्रामीण रुग्णालयात तातडीने उपचारासाठी दाखल केले वैद्यकीय अधिकारी डॉ.अजित पाटिल यांनी प्राथमिक उपचार केले व पुढील उपचारासाठी जळगाव येथे हलविण्यात आले आहे. दरम्यान त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले सोयगाव शहरात मोकाट कुत्र्यांची मोठी दहशत निर्माण झालेली असून या मोकाट कुत्र्याच्या संख्येत वाढ होत आहे. तातडीने यावर उपाय योजना करण्याची मागणी होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ३४ वातानुकूलित ई-बसचे लोकार्पण



अक्षराज : प्रतिनिधी

दि.०१, छ.संभाजीनगर : शहरातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, आरामदायी व पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका व औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उपलब्ध करण्यात आलेल्या ३४ वातानुकूलित इलेक्ट्रिक बसचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते या बससेवेसह महानगरपालिकेच्या विविध विकासप्रकल्पांच्या लोकार्पण शिलाफलकांचे अनावरण करण्यात आले.

यावेळी सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, आमदार सुहास शिरसाट, अनुराधा चव्हाण, नारायण कुचे, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., महापौर समीर राजूरकर, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, क्रीडा व युवक सेवा विभागाचे उपसंचालक शेखर पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शहरवासीयांना आधुनिक व पर्यावरणपूरक बससेवा

महानगरपालिकेच्या शहर बससेवेत नव्याने समाविष्ट झालेल्या या वातानुकूलित इलेक्ट्रिक बसमुळे प्रवाशांना अधिक आरामदायी व सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. सोमवार, दि. २ नोव्हेंबरपासून या बस प्रवासी सेवेत दाखल होणार असून शहरातील विविध मार्गांवर त्यांचे संचालन करण्यात येणार आहे.

या बस नऊ मीटर लांबीच्या असून प्रत्येकी ३२ प्रवासी आसनांची व्यवस्था आहे. जीपीएस आधारित बस ट्रॅकिंग, डिजिटल तिकीट प्रणाली, आधुनिक ब्रेकिंग यंत्रणा व जलद चार्जिंग यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. इलेक्ट्रिक बसमुळे इंधनावरील अवलंबित्व कमी होण्यासह शहरातील वायुप्रदूषण कमी करण्यास मदत होणार आहे.

महानगरपालिकेने पीएम ई-बस योजनेअंतर्गत आणखी १०० इलेक्ट्रिक बस सुरू करण्याचे नियोजन केले आहे. यामुळे शहरातील सार्वजनिक वाहतुकीचा विस्तार होण्यास मदत होणार आहे.

ई-व्ही चार्जिंग स्टेशन व सौरऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण

इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी कॅनॉट गार्डन व बाबा पेट्रोल पंपाजवळील भगवान महावीर उड्डाणपुलाखाली ई-व्ही चार्जिंग स्टेशन उभारण्यात आले आहेत. या प्रकल्पांचेही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. शहरात भविष्यात आणखी दहा ठिकाणी चार्जिंग स्टेशन विकसित करण्याचे नियोजन आहे.

तसेच सिद्धार्थ उद्यान वाहनतळावर १०० किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे वीजबचतीसह स्वच्छ ऊर्जेच्या वापराला चालना मिळणार आहे.

मिटमिटा येथील आधुनिक शाळेच्या नवीन इमारतीचे लोकार्पण

महानगरपालिकेच्या मिटमिटा येथील प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या नवीन इमारतीचे लोकार्पणही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले.

देवगिरी व्हॅली परिसरात उभारण्यात आलेल्या या शाळेत २४ वर्गखोल्या, ग्रंथालय, संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण सुविधा, स्मार्ट वर्गखोल्या व क्रीडांगण उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा या इमारतीत निर्माण करण्यात आल्या आहेत. मे. तापडिया कन्स्ट्रक्शन यांनी सामाजिक उत्तरदायित्व निधीतून शाळेचे बांधकाम पूर्ण केले आहे.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ५९ लाख १४ हजार रुपयांचा धनादेश

या कार्यक्रमात दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ५९ लाख १४ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. महापौर समीर राजूरकर व महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हा धनादेश सुपूर्द केला.

शहरातील सार्वजनिक वाहतूक, स्वच्छ ऊर्जा व शिक्षण क्षेत्रातील या प्रकल्पांमुळे नागरिकांना आधुनिक सुविधा उपलब्ध होण्यासह पर्यावरणपूरक व शाश्वत शहरी विकासाला चालना मिळणार आहे.

आरसीईआरटी मध्ये सरदार वल्लभभाई पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०१, चंद्रपूर : सरदार पटेल मेमोरियल सोसायटी (ट्रस्ट) चंद्रपूर द्वारा संचालित राजीव गांधी अभियांत्रिकी, संशोधन व तंत्रज्ञान महाविद्यालय, चंद्रपूर येथे भारताचे लोहपुरुष, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त तसेच भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान भारतरत्न इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी सरदार पटेल मेमोरियल सोसायटीचे अध्यक्ष विनोद दत्तात्रेय, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल झेड. चिताडे, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व अधिष्ठाता, विविध विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देण्यासोबतच स्वातंत्र्यानंतर देशातील संस्थानांचे विलीनीकरण करुन राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता मजबूत करण्यात ऐतिहासिक भूमिका बजावली. तर इंदिरा गांधी यांनी देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून भारताच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्याचा आणि राष्ट्रसेवेतील योगदानाचा यावेळी गौरवपूर्ण उल्लेख करुन स्मरण करण्यात आले. देशाची एकता, अखंडता, राष्ट्रनिष्ठा आणि लोकसेवेचा आदर्श नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या वतीने या दोन्ही महान राष्ट्रीय व्यक्तिमत्वांना अभिवादन करण्यात आले.